# नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड

**संकेतस्थळ www.nwcmc.gov.in**

**डॉ. राममनोहर लोहिया मुख्य ग्रंथालय, वाचनालय व अभ्यासिका**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, शहरात डॉ. राममनोहर लोहियाच्या नावाने मुख्य ग्रंथालय रणजितसिंघ मार्केट जुना मोंढा येथे चालविण्यात येत असून सदरील ग्रंभालयात मुबलक प्रमाणात मराठी, हिंदी, इंग्रजी व ऊर्दु भाषेचे पुस्तके उपलब्ध आहेत. सदरील ग्रांभालय हे जिल्ह्यामध्ये सर्वात मोठे असून या ग्रंभालय तर्फे आज पर्यंत अनेक सभासदांनी नागरीकांनी, विद्यार्थ्यांनी याचा लाभ घेतला असून विविध विषयावर पि.एच.डी. करणारे प्राध्यापक विद्यार्थ्यांची आपले संशोधन अंतिम करण्यासाठी संदर्भ ग्रंथाचा आधार घेतला आहे व या बाबत आपल्या सादरीकरणामध्ये (presentation) मध्ये ग्रंथालयाचा उल्लेख केला आहे.

आजचे युग हे महिती व तंत्रज्ञानाचे युक असुन या मुळे आजची पिढी ग्रंथालयाकडे जास्त लक्ष देत नाही ते इंटरनेट, व्हाट्सॲप्, फेसबुक, इंस्टाग्राम व विविध चॅनलमध्ये आपला वेळ घालत आहे. ही युवापिढी व जेष्ठ नागरीकांना, महिलांना या क्षेत्राकडे वळविण्याकरीता म.न.पा. ग्रंथालय विविध योजनांची अंमलबजावणी करीत आहे. व अत्यल्प वर्गणि आकारली जात आहे.

तसेच अनामत रक्कम रुपये ३००/- हे सभासदाने आपले सभासदत्व बंद करणे बाबत लेखी अर्ज केल्यास परत करण्यात येतात.

दर वर्षी प्रसिध्द होणाऱ्या दिवाळी अंक खरेदी करून सभासदांना मेजवाणीसाठी उपलब्ध करून दिले जातात. ग्रंथालयाची वेळ पुस्तके देवाण घेवाण करीता सकाळी १०:०० ते सायंकाळी ०५:०० वाजेपर्यंत असुन ग्रंथालयास साप्ताहीक सुट्टी हे दर रविवारी असते.

डॉ. राममनोहर लोहिया मुख्य ग्रंथालयाचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | शाखेचे नाव | ग्रंथ संख्या | वेळ | वर्गणी |
|---|---|---|---|---|
| १ | डॉ. राममनोहर लोहिया ग्रंथालय, जुना मोंढा | १०२८८५ | सकाळी १०:०० ते सांय. ०५:०० | अनामत रक्कम रुपये ३००/- प्रवेश फि रु.१०/- मासिक शुल्क रु. ३०/- |

## शाखा स्वातंत्र्य सैनिक कॉलनी शोभा नगर त्याचा तपशील

| अ.क्र. | शाखेचे नाव | आसन क्षमता | ग्रंथ संख्या | वेळ | वर्गणी |
|---|---|---|---|---|---|
| १ | डॉ. शंकरराव चव्हाण वाचनालय स्वातंत्र्य सैनिक कॉलनी शोभा नगर | ४० | ३२५९ | सकाळी ०८:०० ते सांय. ०५:०० | अनामत रक्कम रुपये ३००/- प्रवेश फि रु१०/- मासिक शुल्क रु. ३०/- |

सध्या प्रत्येक क्षेत्रामध्ये स्पर्धा वाढली असून शहराचा वाढता विस्तार लोकसंख्या प्रमाणे बेरोजगारी सुध्दा त्याच जोमाणे वाढली असून प्रत्येक विद्यार्थी हे शासकिय नौकरीच्या शोधात आहे. व आज घडीला वर्ग १ ते वर्ग ४ च्या पदा करीता महाराष्ट्र शासन व विविध विभागा अंतर्गत होणारी भरती ही लेखी व तोंडी परीक्षेमार्फत केली जात असल्याने प्रत्येक विद्यार्थी हे स्पर्धापरिक्षेची तयारी करीता दिवस-रात्र स्वतःला झोकुन देत आहे. व घरची परिस्थिती अभ्यासाकरीता शांतमय वातावरण बैठक व्यवस्था, पुस्तके, नियत कालिके चालु घडामोडीची माहिती करीता वर्तमाण पत्रे हे सर्व जवळपास प्रत्येक विद्यार्थी खरेदी करू शकत नाही हे लक्षात घेउुन महानगर पालिकेने आपली जबाबदारी व विद्यार्थ्यांना येणारी आर्थिक अडचण पाहुन शहराच्या विविध भागात पाच अभ्यासिका सुरु केल्या आहेत. या अभ्यासिकेमध्ये विविध स्पर्धात्मक परिक्षेची पुस्तके, नियतकालीके, नौकरी विषयक वृत्तपत्रे, इंटरनेटची सुविधा नाममात्र शुल्क आकारुन उपलब्ध करून दिले सर्व अभ्यासिकेत मुलं/मुलीसाठी अभ्यासाकरीता पिण्याच पाणी, बाथरुमची स्वतंत्र व्यवस्था करण्यात आली आहे.

## शहराच्या विविध भागात चालविण्यात येणारे अभ्यासिकांचा तपशील

| अ.क्र. | अभ्यासिकाचे नाव | आसन क्षमता | पुस्तकांची संख्या | वेळ | वर्गणी |
|---|---|---|---|---|---|
| १ | स्पर्धा परिक्ष केंद्र जुना मोंढा | १०० | ९५७२ | स.८:०० ते रात्री ०९:०० | प्रवेश फि रु. ३००/- मासिक शुल्क रु. २००/- |
| २ | स्पर्धा परिक्षा केंद्र उमर कॉलनी | ३७ | ५३०२ | स.८:०० ते रात्री ०९:०० | प्रवेश फि रु. ३००/- मासिक शुल्क रु. १००/- |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ३ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर अभ्यासिका स्टेडियम परिसर | २०० | १३२६७ | स.८:०० ते रात्री ०९:०० | प्रवेश फि रु. ३००/- मासिक शुल्क रु. २५०/- |
| ४ | डॉ. शंकरराव चव्हाण अभ्यासिका सिडको | १२० | ३४५७ | स.८:०० ते रात्री ०९:०० | प्रवेश फि रु. ३००/- मासिक शुल्क रु. २००/- |
| ५ | डॉ. शंकरराव चव्हाण अभ्यासिका स्वातंत्र्य सैनिक कॉलनी | १२३ | १९७१ | स.८:०० ते रात्री ०९:०० | प्रवेश फि रु. ५००/- मासिक शुल्क रु. ५००/- |

आज पर्यंत हजारोच्या संख्येने विद्यार्थ्यांनी उपरोक्त अभ्यासिकेचा लाभ घेऊन विविध विभागात नौकरी लागले असुन त्यात वर्ग ०१ ते वर्ग ०४ असे पदावर आपली सेवा देत आहेत.

तसेच अभ्यासिकेतील विद्यार्थ्यांना स्पर्धात्मक परिक्षेच्यातयारी करीता आवश्यक नोट्स, प्रश्न पत्रिका ईत्यादी आपल्या मोबाईलवर पहाणे, डाऊनलोड करण्यासाठी वाय-फायची सुविधा मोफत सुरु करण्यात आली आहे.

उपरोक्त सर्व अभ्यासिकासाठी दरवर्षी विद्यार्थ्यांकडून आवश्यक असलेली पुस्तकांची सुची मागविण्यात येऊन त्यांच्या मागणी प्रमाणे पुस्तके खरेदी करून विद्यार्थ्यांना उपलब्ध करून दिली जात आहेत.

या खेरीज नागरीक, विद्यार्थी यांच्यामध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी याकरीता शहराच्या विविध भागात सात ठिकाणी वाचन कक्ष (शाखा) चालविण्यात येत असून त्याचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

## शाखा

| अ.क्र. | शाखेचे नाव | वेळ |
|---|---|---|
| १ | शाखा अशोक नगर | सकाळी ०८:०० ते १०:००<br>सायं. ०५:०० ते रात्री ०९:०० |
| २ | शाखा नाना नानी पार्क | सकाळी ०८:०० ते १०:००<br>सायं. ०५:०० ते रात्री ०९:०० |
| ३ | शाखा हैदरबाग | सकाळी ०८:०० ते १०:००<br>सायं. ०५:०० ते रात्री ०९:०० |

| | | |
|---|---|---|
| ४ | शाखा होळी | सकाळी ०८:०० ते १०:००<br>सायं. ०५:०० ते रात्री ०९:०० |
| ५ | शाखा सिडीघाट | सकाळी ०८:०० ते १०:००<br>सायं. ०५:०० ते रात्री ०९:०० |
| ६ | शाखा मिल कॉर्नर | सकाळी ०८:०० ते १०:००<br>सायं. ०५:०० ते रात्री ०९:०० |
| ७ | शाखा खडकपुरा | सकाळी ०८:०० ते १०:००<br>सायं. ०५:०० ते रात्री ०९:०० |

## कॉर्नर वाचनालय (वाचनकट्टे)

शहराची वाढती लोकसंख्या, विस्तार व म.न.पा.ची आर्थिक बाजु लक्षात घेऊन प्रत्येक ठिकाणी वाचन शाखा सुरु करणे शक्य नाही. परंतु नागरीक, विद्यार्थ्यी, युवा पिढीमध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी आपली संस्कृतीची माहिती व्हावी व चांगले संस्कार निर्माण व्हावी या करीता नांदेड वाघाळा शहर महानगर पालिका मुंबई,पुणे सारख्या शहराप्रमाणे शहरात जनसुराज्य योजनेच्या नावे मंदिर, बौध्द विहार, उद्यान, चौक असे एकुण ७० ठिकाणी कॉर्नर वाचनालय (वाचनकट्टे) सुरु केले असून सदरील वाचन कट्ट्यास दररोज मराठी, हिंदी, ऊर्दु व इंग्रजी असे विविध भाषेचे १० वृत्तपत्रांचा मोफत पुरवठा केला जात असून त्याचा त्या त्या परिसरातील जेष्ठ नागरीक लाभ घेत आहेत.

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका विविध मार्गाने फक्त कर वसुल करीत नसुन शहरातील नागरीक, विद्यार्थ्यी, महिलाच्या प्रति आपली जबाबदारी ओळखुन त्या दिशेने सकारात्मक पावले उचलुन त्यांची गरज हि पुर्ण करतात.

## -:: धन्यवाद ::-